**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ याची जबानी**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की : —

**माझे नाव : स्वप्नील बाबासाहेब बुलाखे,**
वय : २९ वर्षे, व्यवसाय : शेती,
राहणार : देउळगांव सिध्दी, ता.नगर, जि.अहमदनगर.

**शपथेवर सरतपास सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री.जी.ए.भोसले :**

फिर्यादी विनोद हा माझा चुलत भाउ असुन आम्ही देउळगांव सिध्दी येथील राहाणारे आहोत. फिर्यादी यांचे गावातील स्टॅन्डच्या बाजुला इस्त्रीचे दुकान आहे.

२. दि.१६/०३/२०२३ रोजी सायंकाळी ५.३० वाजताचे सुमारास मी फिर्यादीच्या इस्त्रीच्या दुकानात गेलो होतो. त्याचेवेळी सार्थक हा त्याचे घ ारून तालीमीमध्ये जाण्यासाठी सायकलने बसस्टॅन्ड ते तालीमीकडे जाणा—या रस्त्याने येत होता. सुरज गिरवले त्याचे चारचाकी बोलेरो वाहनाने सार्थकच्या मागे होता. त्यावेळी मी विनोद याचे इस्त्रीच्या दुकानात होतो. सुरज गिरवलेने सार्थकला थांबविले व गाडीपुढे सायकल का चालवितो असे म्हणुन दमदाटी करून लागला. त्यामुळे विनोद तेथे काय झाले हे विचारण्यासाठी गेला होता. सुरज गिरवलेले विनोदची शर्टाची कॉलर पकडुन 'तुझे मध्ये येण्याचे काय कारण' असे म्हणुन शिवीगाळ करून लागला. त्यानंतर सुरज गिरवले हा त्याचे गाडीतुन लोखंडी पाईप घेवुन आला. सुरज गिरवलेने त्या लोखंडी पाईपने विनोदच्या पाठीवर व डाव्या हाताच्या खांद्यावर मारले. त्यानंतर सुरज गिरवले घटनास्थळी पाईप टाकुन निघुन गेला. त्यानंतर मी माझे भावाला घेवुन पोलीस स्टेशनला गेलो तेथुन पोलीसांची यादी घेवुन आम्ही जिल्हा रूग्नालय, अहमदनगर येथे उचाचराकामी गेलो. पोलीसांनी माझेकडे चौकशी करून माझा जबाब घेतला होता.

३. ज्या लोखंडी पाईपने मारहाण झाली होती तो दाखविल्यास मी ओळखु शकतो. तो लोखंडी पाईप गोल असुन अंदाजे तीन फुट लांबीचा

होता. मला आता आर्टीकल 'अ' दाखविले. हाच तो लोखंडी पाईप आहे ज्याने मारहाण झाली होती. मी सुरज गिरवलेला ओळखतो. तो आजरोजी न्यायालयात हजर नाही. (आरोपीचा गैरहजेरी माफिचा अर्ज)

सरतपास पुर्ण.

४. उलटतपासणीकामी आरोपीच्या वकीलांचा पुकारा करता गैरहजर. मुदतीचा अर्ज नाही. सबब, आरोपीतर्फे उलटतपास नाही या आदेशासह प्रकरण पुढील कार्यवाहीकरिता.

श्रवणोत्तर स्वीकृती,

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
Date: 2024.04.01 17:11:00 +0530

( माया अ. देशमुख )

**दि.०१/०४/२०२४.**

अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.०७, अहमदनगर